आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३० एप्रिल २०२५ - बुधवार

**ठळक बातम्या**

- देशभरात अक्षय्य तृतीयेचा उत्साह, आजपासून चारधाम यात्रेला सुरुवात

- पश्चिम बंगालमधे हॉटेलला लागलेल्या आगीत १५ जणांचा तर आंध्र प्रदेशात झालेल्या अपघातात सात जणांचा मृत्यू

- वेव्हज अर्थात पहिल्या जागतिक दृक्श्राव्य मनोरंजन शिखर परिषदेला उद्यापासून मुंबईत सुरुवात

- मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर सेवानिवृत्त, देवेन भारती नवे पोलीस आयुक्त

**आणि**

- आयपीएल मध्ये, आज चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्ज यांच्यात सामना

**<><><><><>**

साडे तीन मुहूर्तापैकी एक असलेली अक्षय्य तृतीया आज साजरी होत आहे. आजच्या दिवशी केलेल्या कोणत्याही शुभकार्याचं फळ हे अ-क्षय्य म्हणजेच कधीही क्षय न होणारं असतं, अशी लोकांची श्रद्धा आहे. तसंच या काळात सोने, चांदी आणि इतर वस्तू खरेदी करणं शुभ मानलं जातं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना अक्षय्य तृतीयेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे पर्व सगळ्यांसाठी यश, वृद्धी आणि प्रसन्नता घेऊन येवो, असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

महात्मा बसवेश्वर जयंती आज साजरी होत आहे. समाजाप्रति महात्मा बसवेश्वर यांचा दृष्टीकोन आणि उपेक्षितांच्या उत्थानासाठी त्यांनी केलेले प्रयत्न

आजही समाजाला मार्गदर्शन करत असल्याचं सांगत, प्रधानमंत्री मोदी यांनी बसवेश्वर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

चार धाम यात्रेलाही आजपासून सुरुवात झाली. अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर उत्तराखंडमध्ये उत्तरकाशी जिल्ह्यात गंगोत्री आणि यमुनोत्री धामचे दरवाजे पारंपरिक पद्धतीनं उघडण्यात आले असून, केदारनाथ धामचे दरवाजे शुक्रवारी उघडतील आणि बद्रीनाथ धामचे दरवाजे रविवारी उघडतील.

<><><><>

केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक नवी दिल्ली इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली सुरू आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतरची मंत्रिमंडळाची ही पहिलीच बैठक आहे. मंत्रिमंडळाच्या सुरक्षाविषयक समितीची बैठकही आज होणार आहे.

<><><><>

जम्मू आणि काश्मीरमध्ये नियंत्रण रेषेवर काल रात्री पाकिस्तानी सैन्याने केलेल्या गोळीबाराला भारतीय सैन्यानं चोख प्रत्युत्तर दिलं. नौशेरा, सुंदरबनी आणि अखनूर सेक्टरच्या समोरच्या भागात नियंत्रण रेषेवर पाकिस्तानी सैन्यानं भारतीय चौक्यांवर विनाकारण गोळीबार केला. तसंच पाकिस्तानी सैन्यानं बारामुल्ला आणि कुपवाडा जिल्ह्यातही गोळीबार केला. भारतीय सैन्याने याला चोख प्रत्युत्तर दिलं.

<><><><>

पश्चिम बंगालमधल्या मध्य कोलकाता इथल्या फलापट्टी माचुआ जवळच्या एका हॉटेलला काल रात्री आग लागली. या आगीत १५ जणांचा होरपळून मृत्यू झाला. आतापर्यंत १४ मृतदेह हॉटेलमधून बाहेर काढण्यात आले असून आगीचं कारण अद्याप कळलेलं नाही.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्री साहाय्यता निधीतून मृतांच्या नातेवाईकांना

प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात आली आहे. या घटनेच्या चौकशीसाठी एक विशेष पथक तयार करण्यात आलं आहे, अशी माहिती कोलकात्याचे पोलीस आयुक्त मनोज कुमार वर्मा यांनी दिली आहे.

**<><><><><>**

आंध्र प्रदेशातल्या विशाखापट्टणमजवळच्या सिंहाचलम मंदिरात आज सकाळी दर्शन रांगेजवळची भिंत कोसळून सात जणांचा मृत्यू झाला तर १५ जण जखमी झाले. मुसळधार पावसामुळे एक तंबू कोसळल्यानंतर ही भिंत कोसळली. राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती निवारण दलाच्या बचाव पथकांनी घटनास्थळी मदत कार्य सुरु केलं आहे. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून आंध्र प्रदेशचे गृहमंत्री आणि जिल्हा प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

**<><><><><>**

हिमाचल प्रदेशातल्या यमुनानगरमधल्या साधौरा-काला रस्त्यावरच्या असगरपूर गावाजवळ, काल रात्री एका अज्ञात वाहनानं अल्टो कारला धडक दिली. यात कारमधल्या तीन जणांचा जागीच मृत्यू झाला तर दोन जण गंभीर जखमी झाले. हे पाचही तरुण हिमाचल प्रदेशातील चंबा आणि सिरमौर जिल्ह्यातील आहेत. ही धडक इतकी भीषण होती की यात कारचे तुकडे झाले.

**<><><><><>**

*पहिली जागतिक दृक्श्राव्य मनोरंजन शिखर परिषद उद्यापासून मुंबईतल्या जिओ वर्ल्ड कन्वेन्शन सेंटरमध्ये सुरू होत आहे. चार दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमाच्या माध्यमातून मनोरंजन आणि दृक्श्राव्य उद्योगाच्या भविष्याला एक जागतिक व्यासपीठ मिळणार आहे. या परिषदेत मनोरंजन क्षेत्रातली आघाडीची व्यक्तिमत्त्वं, विविध माध्यम समूहांचे प्रमुख कार्यकारी अधिकारी यांच्यासह जगभरातले सर्जनशील विचारसरणीचे आशय निर्माते सहभागी होणार आहेत.*

*त्याशिवाय शंभर देशांमधले सुमारे ५ हजार प्रतिनिधी देखील या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.*

**<><><><>**

वेव्हज २०२५ या कार्यक्रमाच्या थेट प्रसारणामुळे, रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारीत होणारं मराठी राष्ट्रीय बातमीपत्रं आजपासून ४ मे पर्यंत रात्री साडेआठ वाजता प्रसारीत होईल. बातमीपत्राच्या वेळेतला हा बदल ३० एप्रिल ते ४ मे या कालावधीपुरताच आहे.

**<><><><>**

मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर आज सेवानिवृत्त होत आहेत. फणसळकर यांनी ३० जून २०२२ रोजी आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारला होता. ते भारतीय पोलीस सेवेच्या १९८९ च्या तुकडीचे अधिकारी आहेत.

फणसळकर यांच्या जागी विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती यांची मुंबई पोलीस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्याच्या गृह विभागानं याबाबतचे आदेश जारी केले आहेत. ५३ वर्षांचे भारती १९९४ च्या तुकडीतले अधिकारी आहेत. देवेन भारती मूळचे बिहारचे असून त्यांनी झारखंडमधून मॅट्रिक तसंच दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून पदवीचं शिक्षण घेतलं. अतिरिक्त पोलीस आयुक्त, सह पोलीस आयुक्त या पदावर त्यांनी काम केलं आहे. मुंबईवरील २६/११ च्या हल्ल्याचा तपास करणाऱ्या दहशतवादी विरोधी पथकाचं त्यांनी नेतृत्व केलं होतं. विवेक फणसळकर निवृत्त होत असल्याने मुंबई पोलीस आयुक्त पद पदावनत करून पुन्हा अप्पर पोलीस महासंचालक दर्जाचं करण्यात आलं आहे. देवेन भारती आज संध्याकाळी औपचारिक कार्यक्रमात फसणळकर यांच्या कडून पदाची सूत्रं स्वीकारतील.

**<><><><>**

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई हे भारताचे पुढचे सरन्यायाधीश असतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायमूर्ती गवई यांची भारताचे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे. पुढील महिन्याच्या १४ तारखेपासून ते आपला कार्यभार सांभाळतील, अशी माहिती केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी दिली.

**<><><><><>**

आयपीएल मध्ये, आज चेन्नई सुपर किंग्ज चा सामना पंजाब किंग्जबरोबर होणार आहे. चेन्नईतल्या एम.ए चिदंबरम स्टेडियमवर संध्याकाळी साडे सात वाजता हा सामना सुरु होईल. काल रात्री, कोलकाता नाईट रायडर्स ने दिल्ली कॅपिटल्सचा १४ धावांनी पराभव केला. कोलकाता नाईट रायडर्स ने दिलेल्या २०५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, दिल्ली कॅपिटल्सने निर्धारित वीस षटकांत नऊ गडी गमावून १९० धावा केल्या.

**<><><><><>**

कायदा आणि न्याय मंत्रालयाच्या सहकार्यानं भारताच्या महाधिवक्ता कार्यालयातर्फे पुढच्या महिन्यात ३ तारखेला नवी दिल्ली इथं मध्यस्थ संघटनेची एक परिषद आयोजित केली जात आहे. या परिषदेत मध्यस्थ तसंच मध्यस्थ संस्थांना एकत्र आणून मध्यस्थी प्रक्रिये संदर्भातल्या सर्वोत्तम पद्धतींवर चर्चा होणार आहे, अशी माहिती महाधिवक्ता आर. वेंकटरमणी यांनी आज नवी दिल्लीत माध्यमांशी बोलताना दिली.

**<><><><><>**

हरियाणा पंजाबचं पाणी हिसकावण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत सिंह मान यांनी केला आहे. पंजाबमध्ये पाणीसाठा कमी असूनही माणुसकीच्या दृष्टिकोनातून त्यांनी हरियाणाला आधीच ४ हजार क्युसेक पाणी दिलं आहे. मात्र, आता आपल्या राज्यात इतर राज्यांना देण्यासाठी पुरेसा

पाणीसाठा नसल्याचं मान एका निवेदनाद्वारे म्हणाले. केंद्रीय रेल्वे आणि अन्न प्रक्रिया राज्यमंत्री रवनीत सिंह बिट्टू यांनी मान यांच्यावर टीका केली आहे. एकिकडे देश पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाचा सामना करत असताना मान यांनी हरियाणाबरोबर पाण्यावरून वाद निर्माण करणं हे लज्जास्पद असल्याचं बिट्टू म्हणाले आहेत.

//<><><><><>//